सायंदैनिक
# गुड इव्हिनिंग City
goodeveningcity@gmail.com

७ जानेवारी २०२६, बुधवार | वर्ष १४ वे | अंक २३४ | पृष्ठे ६

# रस्ते भटक्या कुत्र्यांपासून मोकळे करणे आवश्यक : सुप्रिम कोर्ट

**नवी दिल्ली, ७ जानेवारी (वृत्तसंस्था) :** बुधवारी सर्वोच्च न्यायालयात भटक्या कुत्र्यांशी संबंधित एका प्रकरणाची सुनावणी होत आहे. चर्चेदरम्यान कुत्र्यांची मनःस्थिती, कुत्र्यांचे समुपदेशन, सामुदायिक कुत्रे आणि संस्थात्मक कुत्रे असे शब्द समोर आले. न्यायमूर्ती विक्रम नाथ म्हणाले, हे फक्त चावण्याबद्दल नाही; कुत्रे धोका निर्माण करतात. अपघातांचा धोका असतो. रस्ते भटक्या कुत्र्यांपासून मोकळे ठेवले पाहिजेत. तुम्ही त्यांना कसे ओळखाल? सकाळी लवकर कोणता कुत्रा कोणत्या मूडमध्ये आहे हे तुम्ही सांगू शकत नाही.

चर्चेदरम्यान भटक्या कुत्र्यांच्या बाजूने युक्तिवाद करणारे कपिल सिब्बल म्हणाले, मी जेव्हा जेव्हा मंदिरात गेलो आहे, तेव्हा मला कधीही काहीही चावलेले नाही. सर्वोच्च न्यायालयाने उत्तर दिले, तुम्ही भाग्यवान आहात. लोकांना चावत आहेत, मुलांना चावले जात आहे. लोक मरत आहेत. कपिल सिब्बल म्हणाले, जर कुत्रा एखाद्याला चावला तर तुम्ही केंद्राला फोन करा, ते त्याला घेऊन जातील, निर्जंतुकीकरण करतील आणि त्याच भागात परत सोडतील. सर्वोच्च न्यायालयाने उत्तर दिले, कुत्र्यांना सोडल्यावर ते चावू नयेत म्हणून त्यांचे समुपदेशन करणे बाकी आहे. हे प्रकरण २८ जुलै २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या कारवाईने सुरू झाले होते, जेव्हा दिल्लीत भटक्या कुत्र्यांच्या चावण्यामुळे होणाऱ्या रेबीज आजारावर एक मीडिया रिपोर्ट प्रकाशित करण्यात आला होता. या प्रकरणात आतापर्यंत ५ वेळा सुनावणी झाली आहे.

# काँग्रेस नेते हिदायत पटेल यांच्यावर चाकूहल्ला



**अकोला, ७ जानेवारी (वृत्तसंस्था) :** राजकीय पूर्ववैमनस्यातून अकोट तालुक्यात काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांची निर्घृण हत्या करण्यात आली. बुधवारी दुपारी मोहाळा (ता. अकोट) येथे नमाज पठणानंतर मशिदीबाहेर चाकूने प्राणघातक हल्ला झाल्यानंतर गंभीर जखमी अवस्थेत त्यांना अकोला येथील ओझोन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान आज पहाटे साडेतीन वाजता त्यांचा मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, हिदायत पटेल हे माहोळ गावात असताना काही हल्लेखोरांनी त्यांना घेरले आणि धारदार शस्त्रांनी त्यांच्यावर सपासप वार केले. या हल्ल्यात पटेल यांच्या पोटावर आणि मानेवर खोलवर जखमा झाल्या आहेत. भरदिवसा झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात मोठी पळापळ झाली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पटेल यांना तातडीने अकोट येथील रुग्णालयात नेण्यात आले. काकाच्या हत्येचा बदला २४ मे २०१९ रोजी लोकसभा निवडणुकीदरम्यान मोहाळा येथे भाजप अल्पसंख्याक सेलचे माजी पदाधिकारी मतीन शेरखाँ पटेल (५८) यांची हत्या झाली होती. या प्रकरणी हिदायत पटेल यांच्यासह दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असून, त्याची सुनावणी सुरू आहे.

हिदायत पटेल हे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष आणि अकोला जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते. त्यांनी २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवली. अकोला जिल्ह्यातील काँग्रेसचा एक आक्रमक आणि महत्त्वाचा चेहरा म्हणून हिदायत पटेल यांची ओळख आहे.


## शिवाजी अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बुलडाणा

### पाहिजेत

शिवाजी अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बुलडाणा करिता कंत्राटी/करार पद्धतीने एकत्रित मानधन तत्वावर बुलडाणा व नांदुरा शाखेकरीता खालीलप्रमाणे पदे भरावयाचे आहेत. त्या करिता पात्र उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पद | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता | वेतन व इतर भत्ते |
|---|---|---|---|
| सहाय्यक शाखाधिकारी (नांदुरा शाखेसाठी) | १ | वाणिज्य शाखेचा पदवीधर तसेच बँकिंग कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | वेतन हे शैक्षणिक पात्रता व अनुभव यांचे आधारे ठरविण्यात येईल. |
| वसुली अधिकारी | १ | वाणिज्य शाखेचा पदवीधर, कोणत्याही बँकेतून निवृत्त/निवृत्ती स्वीकारली असल्यास प्राधान्य सहकार क्षेत्रात वसुली अधिकारी व कर्ज विभागात कर्ज अधीक्षक म्हणून कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | |
| लिपिक | ३ | कोणत्याही बँकेत कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | |

वरीलप्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांनी आपले अर्ज शैक्षणिक कागदपत्राच्या संक्षांकित प्रतिसह दिनांक : १९/०१/२०२६ पर्यंत संस्थेचे मुख्य कार्यालय बुलडाणा येथे खालील पत्त्यावर पाठवावेत. वरील भरती प्रक्रीयेसंदर्भात सर्व अधिकार हे संस्थेने राखून ठेवले आहेत.

– संस्थेचा पत्ता –
बन्सीलाल चेंबर, गजानन महाराज मंदिराजवळ, सुवर्ण नगर, बुलडाणा
जिल्हा – बुलडाणा –४४३००१
संपर्क : ८००२ ८००७ ९१ (हेल्पलाईन नंबर), ९०११०४४७००, ९४०३ ३३८ ५८७








## थोडक्यात

### मलकापूरच्या काटी येथून लाखांचे दागिने लंपास

**खामगाव, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** कुटूंबीय घरात झोपलेले असतांना, अज्ञात चोरट्याने १ लाख ३४ हजार रुपये किंमतीचे सोने-चांदीचे दागिने चोरुन नेल्याची घटना मलकापूर तालुक्यातील काटी येथे घडली. भान्यधी रामदास गोडचवर यांच्या फिर्यादवरुन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अज्ञात चोरट्याने घरातून ४० ग्राम सोन्याचे दागिणे चोरुन नेले. मात्र पोलिसांनी सोन्याची किंमत फक्त १ लाख ३४ हजार दर्शविल्याने चर्चांना उत आला आहे.

### कोयता फिरवून दहशत निर्माण करणाऱ्याविरुध्द गुन्हा

**खामगाव, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** विनापरवाना लोकांमध्ये दहशत पसरविण्याच्या उद्देशाने कोयता हवेमध्ये फिरवणाऱ्या युवकास शिवाजी नगर पोलिसांनी अटक करुन गुन्हा दाखल केला.

शुभम भारत यादव (२८) रा.सतीफैल हा युवक ५ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता दरम्यान निर्मला टर्निंग चौकात धारदार लोखंडी कोयता विनापरवाना लोकांमध्ये दहशत पसरविण्याच्या उद्देशाने हवेत फिरवत असताना तसेच येणाऱ्या-जाणाऱ्यांना ईजा पोहचेल अशा स्थितीत गोंधळ घालताना पोलिसांना मिळून आला. शिवाजी नगर पोलिसांनी त्यास अटक करुन शुभम यादव याच्या विरुध्द कलम ४/१२५ शस्त्र अधिनियम नुसार गुन्हा दाखल केला. तसेच सहकलम १३५ नुसारही गुन्हा दाखल केला. ही कारवाई शिवाजी नगर पोस्टेचे एएसआय शेख युसुफ शेख लुकमान यांनी केली. तपास पोहेकाँ संदीप टाकसाळ करीत आहे.

# 'ई-चालान भरा'च्या बनावट संदेशांतून सायबर फसवणूक

**बुलढाणा, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** तुमच्या वाहनाचे ई-चालान थकीत आहे, तात्काळ भरा,' अशा आशयाचे संदेश किंवा ॲपची लिंक पाठवून नागरिकांची सायबर फसवणूक करण्याचे प्रकार बुलढाणा जिल्ह्यात दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. वाहतूक नियमांचे उल्लंघन झाल्याचे भासवून पाठवण्यात येणाऱ्या या बनावट संदेशांमुळे अनेक नागरिक संभ्रमात सापडत असून, अनावधानाने लिंकवर क्लिक करत आहेत.



सायबर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ई-चालानच्या नावाखाली पाठवण्यात येणाऱ्या एपीके किंवा झीप फाइल्स मोबाइलमध्ये इन्स्टॉल होताच संपूर्ण मोबाइल सायबर चोरट्यांच्या ताब्यात जात आहे. त्यानंतर संबंधित व्यक्तीच्या बँक खात्यांची माहिती, यूपीआय व्यवहार, ओटीपी यांसारखी अत्यंत संवेदनशील माहिती चोरट्यांकडे पोहोचत असून काही मिनिटांतच खात्यातील रक्कम परस्पर काढून घेतली जात आहे. विशेष म्हणजे, हे संदेश अत्यंत अधिकृत वाटावेत, अशा पद्धतीने तयार करण्यात येत असून त्यामध्ये बनावट दंड क्रमांक, वाहन क्रमांक व दंडाची रक्कम नमूद केली जाते. त्यामुळे अनेक नागरिक फसवणुकीला बळी पडत आहेत.दरम्यान, कोणताही संशयास्पद मेसेज, लिंक, एपीके किंवा झीप फाइल उघडू नये. ई-चालान भरण्यासाठी केवळ अधिकृत संकेतस्थळ किंवा अधिकृत ॲपचा वापर करावा, असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे.

फसवणुकीचा संशय आल्यास तत्काळ सायबर पोलिस ठाणे किंवा १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

#### काय काळजी घ्याल?

व्हॉट्सॲप, टेलिग्रामवर आलेल्या एपीके फाइल्स उघडू नका. 'तुमचे चलान भरा' असा घाईचा मेसेज आल्यास लगेच प्रतिसाद देऊ नका. ओटीपी, बँक तपशील, यूपीआय पिन कोणालाही सांगू नका. संशयास्पद मेसेज पुढे फॉरवर्ड करू नका. ओळखीचा नंबर असला तरी पैशांची मागणी खात्रीशिवाय मान्य करू नका, अशा विविध सूचना सायबर पोलिसांकडून नागरिकांना वारंवार दिल्या जात आहेत. त्यानंतरही अशा फाइल नागरिक उघडत आहेत. त्यांची फसवणूक होत आहे.

## डम्पिंग ग्राउंडवरील कचरा पेटविल्याने बेलाड परिसरात प्रदूषण

**खामगाव, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** बेलाड शिव-ारातील डम्पिंग ग्राउंडवर साठविण्यात आलेला घनकचरा पेटविल्याने परिसरात मोठ्या प्रमाणावर धूर व दुर्गंधी पसरली असून, यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. या प्रकाराविरोधात सोमवारी सकाळी बेलाड परिसरातील नागरिक संतप्त झाले. नागरिकांनी थेट घटनास्थळी धाव घेत कचरा टाकण्यास मज्जाव केला. यावेळी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना जाब विचारण्यात आल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर दुपारी ग्रामस्थांच्या शिष्टमंडळासोबत पालिका प्रशासनाची चर्चा होऊन तात्पुरता तोडगा काढण्यात आला.मलकापूर नगरपालिकेच्या हद्दीतील घनकचरा बेलाड शिव-ारातील डम्पिंग ग्राउंडवर संकलित केला जातो. मात्र, येथील कचरा प्रक्रिया यंत्रणा मागील काही काळापासून बंद अथवा अकार्यक्षम असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. परिणामी, कचऱ्याचे ढिगारे वाढत असून, तो कमी करण्यासाठी कचरा पेटविण्यात येत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यामुळे परिसरात सतत धूर पसरून प्रदूषण वाढले असून, श्वसनविकार, डोळ्यांची जळजळ, डोकेदुखी यांसारख्या तक्रारी वाढल्या आहेत.सोमवारी सकाळी सुमारे दहा वाजता घनकचरा घेऊन आलेल्या घंटागाड्या डम्पिंग ग्राउंडवर दाखल होताच मोठ्या संख्येने ग्रामस्थ तेथे जमा झाले. नागरिकांनी कचरा खाली करण्यास तीव्र विरोध करत पालिकेच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. काही वेळ तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता लक्षात घेऊन आरोग्य विभागाच्या प्रतिनिधींनी हस्तक्षेप करत नागरिकांशी संवाद साधला.यानंतर दुपारी बेलाड ग्रामस्थांच्या शिष्टमंडळासोबत पालिका प्रशासनाची बैठक घेण्यात आली. यावेळी ग्रामस्थांनी कचरा पेटविणे तत्काळ थांबवावे, घनकचरा व्यवस्थापनाची यंत्रणा कार्यान्वित करावी तसेच आरोग्यावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी केली.

## बुलढाणा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने खामगाव येथील नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

**खामगाव, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** बुलढाणा येथे अजितदादा पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची जिल्हा आढावा बैठक आयाजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये खामगाव नगर परिषद निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडुन निवडणुक लढवुन नगरसेवक म्हणुन निवडुन आलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित नगरसेविका फौजीया शेख आबीद, नवनिर्वाचित नगरसेवक तहेसीन शाह, नवनिर्वाचित नगरसेविका गायत्री तासतोडे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा अध्यक्ष ॲड.नाझेर काझी, सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघाचे आमदार मनोज कायंदे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश सचिव निर्मलाताई तायडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा, राष्ट्रवादी काँग्रेस सेवादलाचे जिल्हाध्यक्ष देवेंद्रदादा देशमुख आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी बुलढाणा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष ॲड.नाझेर काझी, सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघाचे आमदार मनोज कायंदे यांच्या हस्ते नवनिर्वाचित नगरसेविका फौजीया शेख आबीद, नवनिर्वाचित नगरसेवक तहेसीन शाह, नवनिर्वाचित नगरसेविका गायत्री तासतोडे यांच्यासह बुलढाणा जिल्हयातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सुध्दा शाल व पुष्पगुच्छ देवुन सत्कार करण्यात आला व त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पंजाबराव देशमुख, खामगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा सरस्वतीताई खासने, तालुका अध्यक्ष मनोज वानखडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

## ग्रामीण पत्रकार संघातर्फे संदीपपाल महाराज यांचे राष्ट्रीय कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित

**खामगाव, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा खामगाव तालुका ग्रामिण पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त सप्त खंजेरी वादक प्रबोधनकार संदिपपाल महाराज यांच्या राष्ट्रीय किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ७ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता जि प हायस्कूल लाखनवाडा येथे होणाऱ्या या कार्यक्रमाचे उदघाटन उपविभागीय अधिकारी डॉ रामेश्वर पुरी यांच्या हस्ते करण्यात येईल तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बुलढाणा जिल्हा ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रमोदबापू देशमुख राहतील तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी व विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तीचा सत्कार करण्यात येईल कार्यक्रमाला गट विकास अधिकारी चंदनसिंग राजपूत वन परिक्षेत्र अधिकारी स्वप्निल पवार खामगाव प्रेस क्लबचे अध्यक्ष किशोरआप्पा भोसले , प्रेस क्लबचे खामगाव अध्यक्ष प्रशांत देशमुख सा. ग्रामक्रांतीचे संपादक मंगेश तोमर सा. ग्रामज्योतचे संपादक सुधीर टिकार सा. कुणबी समाजदूतचे संपादक अनिल खोडके दिव्य मराठीचे तालुका प्रतिनिधी नानाभाऊ हिवराळे आधी मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत तरी कार्यक्रमाला लाखनवाडा परिसरातील बंधू-भगिनींनी बहुसंख्येने उपस्थित राहून प्रबोधनाचा लाभ घ्यावा असे आवाहन खामगाव तालुका ग्रामिण पत्रकार संघाचे अध्यक्ष सचिन बोहरपी कार्याध्यक्ष अनिल गिरे उपाध्यक्ष सहदेव वाकोडे सचिव संदिप राठोड व पदाधिकाऱ्यांनी केले आहे

## बाबासाहेबांमुळेच मी प्राध्यापक झालो : प्रा मुकुंद भारसाकडे



**बुलढाणा, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** सम्यक ज्येष्ठ नागरिक संघ, शाखा खामगाव यांच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त माळी भवन येथे जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. अकोला येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय उत्कृष्ट प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मुकुंद भारसाकडे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.प्रा. भारसाकडे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच समाज शिक्षित व प्रगत झाला. बाबासाहेब आपल्या कमाईतील विसावा हिस्सा समाजासाठी देण्याचे सांगत. मात्र आपण बाबासाहेबांवर प्रेम व्यक्त करतो, पण समाजासाठी आर्थिक योगदान देत नाही, ही शोकांतिका आहे.ते पुढे म्हणाले, मी प्राध्यापक झालो; मात्र माझे वडील होऊ शकले नाहीत, कारण त्यांच्या काळात बाबासाहेब नव्हते. माझ्या काळात बाबासाहेब होते, म्हणूनच मी प्राध्यापक होऊ शकलो.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माळी सेवा मंडळाचे अध्यक्ष धोंडीरामजी खंडारे होते. अकोला येथील मनोविकार व व्यसनमुक्ती तज्ज्ञ डॉ. श्रीकांत वानखडे यांनी स्क्रीनद्वारे व्यसनाधीनतेवर मार्गदर्शन केले. दारूसारख्या व्यसनांपासून तरुणांनी दूर राहावे, व्यसनमुक्त जीवनामुळेच आनंदी आयुष्य शक्य होते, असे त्यांनी सांगितले.सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर सौ. सुलोचना सुरेश शिरसाठ व सौ. कल्पना देविदास वानखडे यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डी. एस. वानखडे यांनी केले. सम्यक ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रवीण पहुरकर यांनी संघकार्य व पाहुण्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन श्याम सावदेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन आनंदराव वानखडे यांनी केले.

## चिखली तालुका पत्रकार संघातर्फे दर्पण दिनानिमित्त पत्रकारिता पुरस्कार वितरण व आरोग्य तपासणी शिबिर

**चिखली, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आयोजित दर्पण दिनानिमित्त अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्नित चिखली तालुका पत्रकार संघातर्फे जीवन गौरव पुरस्कार, शोध पत्रकारिता पुरस्कार व स्व. गिरीश दुबे नवपत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळा तसेच आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात पार पडले. चिखली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शिदोरीगृहात दि. ६ जानेवारी रोजी हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार तथा साप्ताहिक 'चिखली अंजली' चे मुख्य संपादक रमाकांत गयाप्रसाद कपूर, शोध पत्रकारिता पुरस्कार देऊळगाव मही येथील अनुभवी पत्रकार सुनील सुदाम मतकर तसेच स्व. गिरीश दुबे नवपत्रकारिता पुरस्कार २०२५ युवा पत्रकार सैय्यद साहिल सैय्यद राजू (उर्फ सद्दाम) यांना प्रदान करण्यात आला. पत्रकार अधिस्वीकृती समितीचे सदस्य राजेंद्र काळे व बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंह राजपूत यांच्या प्रमुख उपस्थितीत व चिखली तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष नितीन फुलझाडे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमास चिखली पोलीस स्टेशनचे ठाणेदार भूषण गावंडे, भाजपाचे ज्येष्ठ नेते रामदासभाऊ देव्हडे, आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष विलास भाडाईत, वंचित बहुजन आघाडीचे बाळासाहेब भिसे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष शंतनू बोंद्रे, तालुकाध्यक्ष संतोष परिहार, बाजार समितीचे उपसभापती रामेश्वर खेडेकर, संचालक गजानन पवार, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अनिल वाकोडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. शिक्षण प्रसारक मंडळ चिखलीच्या वतीने सर्व पत्रकार बांधवांचा फेटे बांधून तसेच भेटवस्तू देऊन यथोचित सत्कार देखील करण्यात आला.चिखली शहर व तालुक्यातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमस्थळी पत्रकारांच्या आरोग्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य तपासणी शिबिरात ईसीजी, शुगर, किडनी, लिव्हर, थायरॉईड, रक्ततपासणी तसेच नेत्र तप-ासणी करण्यात आली. या शिबिराचा लाभ मोठ्या संख्येने पत्रकारांनी घेतला.



प्रमुख भाषणात राजेंद्र काळे यांनी चिखली शहरातील पत्रकारितेच्या उज्ज्वल इतिहासाचा आढावा घेत चिखली तालुका पत्रकार संघ ही परंपरा नेटाने जोपासत असल्याबद्दल कौतुक केले. पुरस्कारांच्या माध्यमातून भविष्यातही येथील पत्रकार अधिक सकस पत्रकारिता करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. रणजीत राजपूत यांनी चिखली तालुका पत्रकार संघाच्या विविध उपक्रमांमुळे पत्रकारितेला सामाजिक बांधिलकीची जोड मिळाल्याचे नमूद केले. अध्यक्षीय भाषणात नितीन फुलझाडे यांनी आद्य मराठी पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करून सर्व पत्रकारांना दर्पण दिनाच्या शुभेच्छा दिल्या. जीवन गौरव पुरस्कार स्वीकारताना रमाकांत कपूर यांनी सत्काराला उत्तर दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार कल्याण बहुउद्देशीय संस्थेचे सचिव रेणुकादास मुळे यांनी तर प्रास्ताविक संस्थेचे कोषाध्यक्ष कैलास गाडेकर यांनी केले. संस्थेचे संचालक इफ्तेखार खान यांनी संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भिकू लोळगे यांनी आभार मानले. सामूहिक राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पत्रकार कल्याण बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष संतोष लोखंडे, उपाध्यक्ष कैलास शर्मा, सहसचिव रवींद्र फोलाने यांच्यासह चिखली तालुका पत्रकार संघाचे सचिव महेश गोंधणे, सहसचिव रमीज राजा, कोषाध्यक्ष छोटू कांबळे, संघटक भरत जोगदंडे, ज्येष्ठ सदस्य नितीन गुंजाळकर, कमलाकर खेडेकर, योगेश शर्मा, इमरान शाह, सत्य कुटे, तौफिक अहमद, साबीर शेख, राजेंद्र बिडवे तसेच हरिहर सोळंके, मुक्तार शेख, गणेश अंभोरे, विनोद कुटे, विष्णू पंडित यांनी विशेष पुढाकार घेतला.

गुड इव्हिनिंग City
फॅशन | संसार | सौंदर्य
# सखी

## काखेतला काळेपणा घालविण्यासाठी...

**काळवंडलेल्या अंडरआर्म्सच्या समस्येमुळे महिला त्रस्त असतात. कारण काळ्या पडलेल्या काखेमुळे स्लीव्हलेस स्टायलिश कपडे परिधान करणे गैरसोयीचे ठरतं. पण या समस्येवर वेळीच उपाय करणं आवश्यक आहे. आपल्या ओळखीच्या डॉक्टरांशी संपर्क साधून या समस्येमागील कारणं जाणून घ्या आणि योग्य ते उपचार करा. तज्ज्ञांचा सल्ला घेऊन आपण यावर नैसर्गिक- आयुर्वेदिक उपाय सुद्धा करू शकता. हे उपचार नियमित केल्यास समस्या दूर होण्यास मदत मिळू शकेल. पण काखेतील डाग एक-दोन दिवसांत दूर होणार नाहीत, यासाठी तुम्हाला उपचारांमध्ये सातत्य टिकवून ठेवावे लागेल.**



काही जण ही समस्या दूर करण्यासाठी महागड्या स्वरुपातील केमिकलयुक्त ट्रीटमेंटचाही आधार घेतात. पण याऐवजी साध्यासोप्या नैसर्गिक उपचारांची मदत घ्यावी. यामुळे त्वचेला दीर्घकाळासाठी लाभ मिळतील. काळ्या पडलेल्या अंडरआर्म्सची समस्या दूर करण्यासाठी दररोज १० मिनिटांचा वेळ काढा आणि खालील नमूद केलेले नैसर्गिक उपचार न विसरता करा. जाणून घेऊया उपचारांबाबतची माहिती...

- कच्चा बटाटा : काखेची त्वचा काळी पडली असेल तर यावर नैसर्गिक उपाय म्हणून आपण कच्च्या बटाट्याचा उपयोग करू शकता. नियमित २० मिनिटे कच्च्या बटाट्याने काखेच्या काळ्या पडलेल्या त्वचेवर हलक्या हाताने मसाज करावा. बटाट्यातील पोषण तत्त्व आपल्या त्वचेसाठी लाभदायक असतात. योग्य पद्धतीने उपाय केल्यास काळवंडलेल्या अंडरआर्म्सची समस्या हळूहळू कमी होण्यास मदत मिळेल.
- कसा करावा बटाट्याचा वापर ? : एक मध्यम आकारातील बटाटा घ्या व पाण्याने स्वच्छ धुऊन त्याची साल काढा. यानंतर बटाटा किसून घ्या. बटाट्याचा रस फेकू नका. किसलेला बटाटा आपल्या अंडरआर्म्सच्या त्वचेवर लावा आणि १० मिनिटांसाठी हलक्या हाताने मसाज करा. यानंतर १० मिनिटांसाठी बटाट्याचा रस कापसाच्या मदतीने काखेवर लावा. रस सुकल्यानंतर थंड पाण्याने आंघोळ करावी.
- कोरफड : त्वचेशी संबंधित समस्या दूर करण्यासाठी कोरफड रामबाण उपाय आहे. आयुर्वेदामध्ये या औषधी वनस्पतीला भरपूर महत्त्व आहे. तुमच्या घरामध्ये कोरफडीचे रोप असल्यास त्यापासून घरच्या घरी नैसर्गिक स्वरुपात जेल तयार करा. हे जेल आपण अंडरआर्म्स तसंच चेहऱ्यावरही लावू शकता. यासाठी कोरफडीचे एक पान कापून घ्या. यातील गर एका वाटीमध्ये काढा. कोरफडीचा गर आपण थेट अंडरआर्म्सवर लावू शकता किंवा जेलचाही वापर करू शकता. कोरफड जेल लावल्यानंतर हलक्या हाताने अंडरआर्म्सचा मसाज करावा.
- कोरफडीचे त्वचेसाठी फायदे : व्हिटॅमिन आणि खनिजांचा उत्तम स्त्रोत म्हणजे कोरफड. हे घटक निर्जीव आणि निस्तेज त्वचेची समस्या दूर करण्यास मदत करतात. त्वचेवरील मृत पेशी काढण्यासाठी कोरफड प्रभावी उपाय आहे. आठवड्यातून एकदा किंवा दोनदा कोरफड जेलने अंडरआर्म्सचा मसाज केल्यास तुम्हाला त्वचेमध्ये हळूहळूफरक जाणवेल. कोरफड जेल अंडरआर्म्सवर लावा, १० मिनिटांसाठी मसाज करा. त्यानंतर पाच ते सात मिनिटांसाठी जेल त्वचेवर लावून ठेवा. यानंतर थंड पाण्याने आंघोळी करावी.
- मुलतानी माती : आयुर्वेदिक उपचारांमध्ये मुलतानी मातीला महत्त्वाचे स्थान आहे. यातील औषधी गुणधर्मांमुळे त्वचेवरील मृत पेशी काढण्यास मदत मिळते. त्वचेवरील रोमछिद्र देखील स्वच्छ होतात.

# खुलवा प्रत्येक अवयवाचे सौंदर्य!



**शरीराचे सौंदर्य खुलवण्यासाठी प्राचीन काळापासून तेलाचा उपयोग केला जात आहे. या शुद्ध आणि नैसर्गिक तेलांचा हल्ली बहुतांश जण एसेंशिअल ऑइल म्हणून उल्लेख करतात. साधारणतः एसेंशिअल ऑइल खूप महाग असतात. पण काही विशेष तेल तुमच्या खिशाला परवडणारी देखील आहेत आणि सहज उपलब्धही होतात. शुद्ध, नैसर्गिक आणि स्वस्त तेलांचा उपयोग करून सौंदर्य कसं खुलवायचे? याबाबतची माहिती आपण जाणून घेणार आहोत. या तेलांचे वैशिष्ट्य म्हणजे याचा योग्य प्रमाणात उपयोग केल्यास शरीराच्या प्रत्येक अवयवाचे सौंदर्य खुलण्यास मदत मिळू शकते. उदाहरणार्थ दात, नखे, केस, त्वचा, डोळे, इत्यादी...**

### शुभ्र दातांसाठी तिळाचं तेल

बहुतांश लोक दातांच्या पिवळेपणामुळे त्रस्त असतात. काही लोकांचे दात नीट स्वच्छता न केल्याने पिवळे दिसतात तर काहींचे निसर्गतःच पिवळे असतात. ही समस्या दूर करण्यासाठी तुम्ही तिळाच्या तेलाचा उपयोग करू शकता. थोडेसे तेल आपल्या तोंडामध्ये घ्या. यानंतर एक मिनिटांसाठी ऑइल पुलिंग करा. या प्रक्रियमध्ये तेल पोटात जाणार नाही, याची काळजी घ्यावी. मिनिटभरानंतर तेल तोंडाबाहेर फेकावे. नियमित हा उपाय केल्यास दातांवरील चमक वाढेल. यामुळे दात आणि हिरड्या मजबूत होण्यासही मदत मिळते.



- बॉडी डिटॉक्स करण्यासाठी अळशीचे तेल : अळशीच्या तेलाचा शरीर डिटॉक्स करण्यासाठी मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. याद्वारे शरीरातील सर्व हानिकारक आणि विषारी घटक बाहेर फेकले जातात. या प्रक्रियेमुळे आपल्या त्वचेवरील चमक वाढते. अन्नपदार्थांच्या पचनप्रक्रियेदरम्यान शरीरामध्ये काही रासायनिक क्रिया देखील घडतात. यादरम्यान चांगल्या आणि पौष्टिक पाचक रसासह हानिकारक पदार्थांचीही निर्मिती होते. यामुळे शरीरास अपाय होण्याची शक्यता असते.
- घनदाट केसांसाठी वापरा जास्वंदाचे तेल : पातळ केसांची समस्या दूर करण्यासाठी जास्वंदाचे तेल अतिशय प्रभावी मानले जाते. तुमचे केस खूपच पातळ आणि निर्जीव झाले असल्यास या तेलाने आठवड्यातून तिनदा केसांचा मसाज करावा. नियमित हा उपाय केल्यास केसांना भरपूर लाभ मिळतील. जास्वंदाच्या तेलामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर असते. मुळांसह केसांना हे तेल लावल्यास केसांमध्ये कोलेजनची मात्रा वाढते. ज्यामुळे केस घनदाट आणि मजबूत होतात. जास्वंदाच्या तेलामध्ये नारळाचे तेल किंवा बदाम तेल मिक्स करू शकता.
- मुरुमांची समस्या दूर करण्यासाठी टी-ट्री ऑइल : टी-ट्री ऑइलमुळे त्वचेशी संबंधित कित्येक समस्या दूर होण्यास मदत मिळते. ब्लॅक हेड्स, व्हाइट हेड्स, मुरुम, मुरुमांचे डाग इत्यादी समस्यांवर टी ट्री ऑइल रामबाण उपाय आहे. नारळ किंवा बदामाच्या तेलामध्ये टी-ट्री ऑइल मिक्स करून त्वचेवर लावल्यास चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी होण्यास मदत मिळेल. त्वचा सैल देखील पडणार नाही. टी-ट्री ऑइलचा त्वचेवर कधीही थेट उपयोग करू नये. दुसऱ्या तेलामध्ये मिक्स करूनचे हे तेल वापरावे.
- सुंदर पापण्यांसाठी एरंडेल तेल : पापण्याचे केस विरळ आणि पातळ असल्यास ही समस्या दूर करण्यासाठी एरंडेल तेलाचा उपयोग करावा. एरंडेल तेलाचे काही थेंब पापण्यांना लावा. ५ ते १० मिनिटांसाठी मसाज करा. हे तेल तुम्ही आपल्या आइब्रोजवरही लावू शकता. नियमित उपाय केल्यास पापण्या व आइब्रोजमध्ये आपल्याला फरक जाणवेल.
- ऑलिव्ह ऑइल : ऑलिव्ह ऑइलमधील फॅटी ॲसिड्स त्वचा आणि आरोग्यासाठी पोषक आहेत. नेहमीच्या स्वयंपाकामध्येही आपण या तेलाचा समावेश करू शकता. या तेलाच्या सेवनामुळे केस, नखे आणि त्वचेचे आरोग्य आणि सौंदर्य अधिक निरोगी राहण्यास मदत मिळते.

### सौंदर्य खुलवण्यासाठी बदामाचे तेल

बदामामध्ये व्हिटॅमिन ई, व्हिटॅमिन ए आणि अँटी-फंगल गुणधर्म असतात. या तेलाच्या उपयोगामुळे त्वचा, केस, नखे, डोळे इत्यादी अवयवांचे सौंदर्य खुलण्यास मदत मिळते. या तेलातील पोषक घटकांमुळे त्वचेतील ओलावा टिकून राहतो. यामुळे कोरड्या त्वचेची आणि सुरकुत्यांचीही समस्या निर्माण होत नाही. आहारतज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार या तेलाचा उपयोग आपण स्वयंपाकामध्येही करू शकता. अथवा मॉइश्चराइझर म्हणून हे तेल वापरू शकता. बदामाचे तेल त्वचा आणि केसांच्या आरोग्यासाठी पोषक मानले जाते.

## पोअर्सची खोलवर अशी करा स्वच्छता

- चेहऱ्यासाठी फेस स्टीमरचे फायदे : फेस स्टीमरमुळे त्वचेवरील रोमछिद्रे खुली होण्यास आणि त्वचेवरील सर्व प्रकारची दुर्गंध स्वच्छ करण्यास मोठी मदत मिळते. चेहऱ्यावर मुरुमांची समस्या निर्माण होण्यास कारणीभूत असणाऱ्या बॅक्टेरियाही समूळ नष्ट होतात. फेस स्टीमरमुळे ब्लॅकहेड्स देखील सहजरित्या काढण्यास मदत मिळते. आपल्या चेहऱ्याच्या त्वचेवर नैसर्गिक तेलाचा (सीबम) स्त्राव होतो. अति प्रमाणात सीबमचा स्त्राव झाल्यास मुरुमांची समस्या निर्माण होऊ शकते. पण फेस स्टीमरमुळे सीबमचा अतिरिक्त स्त्राव नियंत्रणात येऊ शकतो.
- रक्तप्रवाह वाढतो : चेहऱ्यावर गरम पाण्याची वाफ घेतल्यास रक्ताभिसरण प्रक्रिया सुधारण्यास मदत मिळते. यामुळे ऑक्सिजन त्वचेच्या पेशींपर्यंत सहज पोहोचते आणि चेहऱ्यावर नैसर्गिक चमक देखील येते. फेस स्टीमरमुळे कोलेजनचे उत्पादन सुद्धा वाढते आणि आपली त्वचा सैलही पडत नाही. याचा नियमित उपयोग केल्यास त्वचेवरील सुरकुत्या देखील कमी होतील. हे टुल तुमच्या त्वचेच्या आवश्यकतांची काळजी घेईलच शिवाय त्वचेचं हिवाळा आणि उन्हाळ्यातही संरक्षण करेल. यासाठी तुम्हाला केवळ काही मिनिटांसाठी चेहऱ्यावर वाफ घ्यायची आहे.



गुड इव्हिनिंग City

# निरामय



# पत्ता कोबीतील किड्याने 18 वर्षीय मुलीचा मृत्यू!

## डॉक्टरांनी सांगितले की हा किडा मेंदूत कसा प्रवेश करतो अन् तो कसा रोखायचा...

**उत्तर प्रदेशातील अमरोहा येथील १८ वर्षांची विद्यार्थिनी इल्मा नदीम हिचा दिल्लीतील राम मनोहर लोहिया रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. फास्टफूड खाल्ल्यानंतर तिची तब्येत बिघडली. सुमारे एक महिन्यापूर्वी तिला टायफॉइड झाला होता, परंतु बरे होण्याऐवजी तिची प्रकृती आणखीच बिकट झाली. नोएडातील एका खासगी रुग्णालयात केलेल्या सीटी स्कॅन आणि एमआरआय तपासणीत डॉक्टरांना तिच्या मेंदूत २० ते २५ गाठी आढळल्या, ज्या कदाचित परजीवी संसर्गामुळे झाल्या. डॉक्टरांचा दावा आहे, की हा संसर्ग फास्ट फूडमध्ये वापरल्या जाणाऱ्या कोबीमधून पसरला आहे. तिची प्रकृती बिघडल्याने तिला आरएमएल रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे तिच्या मेंदूची शस्त्रक्रिया करण्यात आली, परंतु सर्व प्रयत्न करूनही तिचा जीव वाचवता आला नाही. फास्ट फूडमध्ये कोबीचा वापर केला जातो आणि असे म्हटले जाते की कोबीचे किडे मेंदूत प्रवेश करू शकतात. ज्यामुळे एखाद्या व्यक्तीची स्थिती बिघडू शकते आणि मृत्यू देखील होऊ शकतो. न्यूरोलॉजिस्ट डॉ. प्रियंका शेरावत यांनी एका पोस्टमध्ये मेंदूतील किड्यांचा विषय सविस्तरपणे मांडला आहे.**

### कोबीचा किडा म्हणजे काय?

बऱ्याच लोकांचा असा विश्वास आहे की कोबी खाल्ल्यानंतर त्यातील किडे मेंदूत प्रवेश करतात. ज्यामुळे व्यक्ती वेडा होऊ शकतो, पक्षाघात होऊ शकतो किंवा मृत्यूही होऊ शकतो. यामुळे प्रश्न निर्माण होतोः हे खरे आहे का? डॉक्टरांनी स्पष्ट केले की कोबी शेतात पिकवल्यावर माती आणि ओलाव्यामुळे सहजपणे कीटकांसाठी प्रजनन स्थळ बनते. त्याची पाने थरबद्ध असतात, ज्यामुळे लहान कीटक आणि त्यांची अंडी आत लपतात. तथापि, याचा अर्थ असा नाही की कोबी खाल्ल्याने किडे थेट मेंदूत शिरतात.

### ब्रेन वर्मचा वैद्यकीय अर्थ

डॉक्टरांनी स्पष्ट केले की 'ब्रेन वर्म'ला वैद्यकीय भाषेत न्यूरोसिस्टिसरकोसिस म्हणतात. हा आजार टेनिया सोलियम नावाच्या टेपवर्मच्या अंड्यांमुळे होतो. या किड्याची अंडी माती, घाणेरड्या भाज्या आणि कमी शिजवलेल्या मांसामध्येही असू शकतात. डॉक्टरांच्या मते, जेव्हा एखादी व्यक्ती घाणेरड्या भाज्या किंवा कमी शिजवलेले मांस खातो तेव्हा या किड्यांची अंडी पोटात जातात. आपली पचनसंस्था अनेकदा ही अंडी पूर्णपणे नष्ट करण्यात अपयशी ठरते. ही अंडी रक्तप्रवाहातून शरीराच्या विविध भागांमध्ये, जसे की मेंदू, डोळे, यकृत आणि स्नायूंमध्ये जाऊ शकतात. जेव्हा ही अंडी मेंदूपर्यंत पोहोचतात तेव्हा शरीराची रोगप्रतिकारक शक्ती त्यांच्या विरोधात प्रतिक्रिया देते, ज्यामुळे मेंदूला सूज येते.

### या गोष्टींची घ्या काळजी

डॉक्टर हेही स्पष्ट करतात की केवळ कोबीच नव्हे, तर कोणतीही घाणेरडी किंवा नीट न धुतलेली भाजी खाल्ल्यास ही समस्या उद्भवू शकते. कोबीला जास्त पत्ते असल्यामुळे त्यामध्ये जंतूंची अंडी लपलेली असण्याची शक्यता अधिक असते. मात्र याचा अर्थ असा नाही की कोबी खाणे पूर्णपणे बंदच करावे. योग्य पद्धतीने धुऊन आणि शिजवून खाल्ल्यास कोबी सुरक्षित ठरते.

### मेंदूच्या किड्यापासून वाचण्याचे उपाय

डॉक्टर सांगतात, की बचाव करण्याचा सर्वांत चांगला मार्ग म्हणजे स्वच्छता आणि योग्य आहार. केवळ पावसाळ्यातच नाही, तर नेहमीच अर्धवट शिजलेले अन्न खाणे टाळावे. विशेषतः मांस कधीही अर्धवट शिजलेले खाऊ नये. मांस नीट धुऊन पूर्णपणे शिजवूनच खावे. याशिवाय भाज्यांची स्वच्छता करणेही फार महत्त्वाचे आहे. भाज्या चांगल्या प्रकारे शिजवल्यास जंतूंची अंडी नष्ट होतात .

# 7 दिवसांत ब्लडशुगर कमी करणाऱ्या 7 गोष्टी!




## मधुमेह राहील नियंत्रणात...

**जगभरात मधुमेह हा आता सामान्य आजार बनत चालला आहे. भारतात मधुमेहाच्या रुग्णांची संख्या सर्वाधिक आहे. मधुमेहामुळे अनियंत्रित साखरेची पातळी वाढते, जी नियंत्रित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. रक्तातील साखरेची उच्च पातळी शरीरात अनेक समस्या निर्माण करू शकते.**

### रक्तातील साखर कशी कमी करावी?

मधुमेही त्यांच्या रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी औषधे घेतात, परंतु तुम्ही औषधांशिवाय देखील ते नियंत्रित करू शकता. तुम्हाला फक्त तुमच्या आहाराकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. निरोगी आहार तुमच्या रक्तातील साखर कमी करण्यासदेखील मदत करू शकतो. रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यासाठी काही दैनंदिन पदार्थ हे सर्वात शक्तिशाली टूल्स आहेत. प्रसिद्ध डॉक्टरांनी सात अन्नपदार्थ शेअर केले आहेत, जे दैनंदिन आहारात समाविष्ट केले तर फक्त सात दिवसांत फरक पडू शकतो. हे पदार्थ तुमच्या शरीराला इन्सुलिन-संवेदनशील बनवण्यास आणि ग्लुकोज व्यवस्थापित करण्यास मदत करतात.



#### भेंडी

भेंडीची भाजी मधुमेहींसाठी अत्यंत फायदेशीर आहे. भेंडीमध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते. ते साखरेचे प्रमाण वाढण्यास प्रतिबंध करते. भेंडीची भाजी सेवन केल्याने इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता देखील सुधारते, ज्यामुळे शरीराला इन्सुलिनचा अधिक चांगला वापर करता येतो.



#### ॲव्होकॅडो


आजकाल, लोकांना त्यांच्या आहारात ॲव्होकॅडोचा समावेश करायला आवडते. हे थोडे महागडे फळ आहे, परंतु त्याचे फायदे अगणित आहेत. त्यात फायबर आणि हेल्दी फॅट असतात, जे अत्यंत फायदेशीर कॉम्बो आहे. हे संयोजन पचन कमी करते आणि रक्तातील साखरेची पातळी अधिक स्थिर ठेवते.



#### मशरूम


मधुमेहाच्या रुग्णांसाठी सुपरफूड म्हणजे मशरूम, जे जीवनसत्त्वे, खनिजे, फायबर आणि अँटिऑक्सिडंट्ससह विविध आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध असतात. त्यात कार्बोहायड्रेट्स देखील कमी असतात. इन्सुलिन प्रतिरोधनाशी संबंधित जळजळ कमी करण्यासाठी मशरूमचे सेवन उत्कृष्ट ठरते

#### टोफू



शाकाहारी लोकांसाठी प्रथिनांचा एक आवश्यक स्रोत, टोफू रक्तातील साखरेची पातळी व्यवस्थापित करण्यास देखील मदत करू शकते. तुमच्या शरीराला ग्लुकोजचा अधिक प्रभावीपणे वापर करण्यास मदत करते.

#### ग्रीन टी




तुम्ही दररोज ग्रीन टी देखील पिऊ शकता. या चहामध्ये कॅटेचिन भरपूर प्रमाणात असतात, जे ग्लुकोज चयापचय वाढवतात आणि चरबी जाळण्यास प्रोत्साहन देतात, ज्यामुळे रक्तातील साखरेचे व्यवस्थापन सोपे होते.

#### फुलकोबी



मधुमेहाच्या रुग्णांनी त्यांच्या आहारात फुलकोबीचा समावेश करावा. फुलकोबीमध्ये सल्फोराफेन भरपूर असते, जे जळजळ कमी करते आणि इन्सुलिनच्या ॲक्टिव्हिटीचे समर्थन करते. तुमच्या दैनंदिन आहारात ते समाविष्ट करा आणि तुम्हाला जलद सुधारणा दिसू लागेल.

#### जव



बार्ली अर्थात जव हे फायबरयुक्त संपूर्ण धान्य आहे जे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करणे सोपे करते. त्याचे सेवन केल्याने आतड्यांचे आरोग्य सुधारते आणि ग्लुकोजच्या चढउतारांना चालना मिळते.

सायंदैनिक
गुड इव्हिनिंग City
७ जानेवारी २०२६, बुधवार




# सुप्रीम कोर्टाचे आदेश कागदापुरतेच..?

## अंमलबजावणीत अपयशी ठरत असल्याने जितेंद्र जैन यांचे सरन्यायाधीशांना पत्र





**बुलढाणा, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले महत्त्वाचे निर्णय प्रत्यक्षात प्रभावीपणे राबवले जात नसल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र एन. जैन यांनी भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे. कायद्याचे पालन करणाऱ्या सामान्य नागरिकांच्या मनातील वेदना या निवेदनातून स्पष्टपणे व्यक्त झाल्या असून, शासनप्रशासन यंत्रणेच्या उदासीनतेवर त्यांनी कठोर शब्दांत बोट ठेवले आहे. निवेदनात जितेंद्र जैन यांनी नमूद केले आहे की, ध्वनीप्रदूषण, वाहतूक सुरक्षा, मद्यविक्री, अनधिकृत बांधकाम, शस्त्रांचे प्रदर्शन आदी विषयांवर सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिलेले असतानाही प्रत्यक्षात त्यांची सर्रास पायमल्ली होत आहे. लग्न समारंभ, धार्मिक स्थळे, राजकीय व सांस्कृतिक कार्यक्रम, विजय मिरवणुका तसेच डीजेच्या कर्कश आवाजामुळे ध्वनी प्रदूषणासंदर्भातील डेसिबल मर्यादा खुलेआम मोडल्या जात असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. विशेष म्हणजे, अनेकदा पोलीस अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित असतानाही कोणतीही कारवाई होत नसल्याने राजकीय लोकांसाठी वेगळे कायदे आणि सामान्य नागरिकांसाठी वेगळे कायदे आहेत का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.महामार्गालगत मद्यविक्रीच्या दुकानांबाबत सर्वोच्च न्यायालयाने ठरवलेल्या अंतराच्या निकषांचे उल्लंघन होत असल्यामुळे 'ड्रंक अँड ड्राईव्ह'मुळे अपघात वाढत असून निरपराधांचे बळी जात असल्याचेही निवेदनात नमूद आहे. दुचाकीस्वारांसाठी हेल्मेट सक्ती, चारचाकी वाहनांतील सीट बेल्ट, समोरील-मागील गार्ड यांसारख्या सुरक्षेशी निगडित आदेशांची अंमलबजावणी काही काळापुरती आणि तीही फक्त शहरी भागातच होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.तलवारीने केक कापणे, वाढदिवस व मिरवणुकांत शस्त्रांचे प्रदर्शन यासारखी कृत्ये सोशल मीडियावर व्हायरल होत असतानाही ठराविक 'पावरफुल' लोकांवर कारवाई होत नसल्याने कायद्याची भीती संपत चालल्याची खंत जैन यांनी व्यक्त केली आहे. अनधिकृत बांधकामांच्या बाबतीतही आर्थिक व्यवहार करणाऱ्यांवर कारवाई टाळली जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय जर केवळ कागदापुरते मर्यादित राहत असतील आणि प्रशासन त्यांची अंमलबजावणी करण्यात अपयशी ठरत असेल, तर हा न्यायव्यवस्थेचा अपमान नाही काय? असा थेट सवाल उपस्थित करत, जैन यांनी सरन्यायाधीशांनी स्वतः लक्ष घालून केंद्र व राज्य शासनाला ठोस निर्देश द्यावेत, अशी मागणी केली आहे. तसेच कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर उेपींशार्ािष उैींीं अंतर्गत कठोर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.देशातील कोट्यवधी कायदे पाळणाऱ्या नागरिकांच्या भावना व्यक्त करणारे हे निवेदन न्यायव्यवस्थेच्या दालनात गंभीर चर्चा घडवून आणेल का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जिल्हा माहिती कार्यालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन



**बुलढाणा, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** मराठी पत्रकारितेचे जनक, 'दर्पण'कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ जिल्हा माहिती कार्यालयात पत्रकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्र. जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

याप्रसंगी माहिती सहायक सतिष बघमारे, पत्रकार गणेश उबरहंडे, डिगांबर कंकाळ, संजय गवई, वरिष्ठ लिपीक श्रेया दाभाडकर, प्रेमनाथ जाधव, प्रतिक फुलाडी, जयंत वानखेडे, शिपाई राम पाटील, वाहनचालक नामदेव घट्टे यांनी फुलपुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

## न्यायालयाच्या आदेशाने ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल



**खामगाव, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** तालुक्यातील ग्राम शिर्ला नेमाने येथे शेतीचा वाद व सोयाबीन तसेच मळणीयंत्र चोरुन नेल्याप्रकरणी न्यायालयाच्या आदेशाने ९ जणांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

हिवरखेड पोलिसात रुख्मीनाबाई रामेश्वर चांदकर रा. खेड्डी ता. पातुर जि. अकोला यांच्या फिर्यादवरुन महादेव शंकर निंबाळकर, गिता महादेव निंबाळकर दोन्ही रा. शिर्ला नेमाने, योगेश भानुदास केणेकर, उषा योगेश केणेकर दोन्ही रा. बटवाडी ता. बाळापूर जि. अकोला, गंगाराम तुकाराम चांदकर, नंदा गंगाराम चांदकर दोन्ही रा. देऊळगाव भंडार ता. रिसोड, सुनिता वसंता केणेकर व रेखा सुनिल केणेकर दोन्ही रा. बोरगाव मंजू व संजय जामोदे रा. अंभोडा ता. नांदुरा या ९ जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

## विनापरवाना देशी दारु जप्त

**खामगाव, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** टेंभूर्णा येथील राजेश मरिभान हिवराळे हा बारादरी भागात विनापरवाना देशीदारु सह पोलिसांना मिळून आला.

पोकों गणेश कोल्हे यांनी केलेल्या कारवाईत आरोपीजवळून २ हजार १० रुपयाचा दारु साठा जप्त करुन शहर पोलिसात गुन्हा नोंदविण्यात आला. सदर कारवाई ३ जानेवारी रोजी रात्री ८.४० वाजताच्या सुमारास केली. पुढील तपास पोना सागर भगत हे करीत आहेत.

## किरण सांगळोदकर वाघमारे यांची पुस्तक परीक्षण स्पर्धेच्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**बुलढाणा, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या वतीने सद्य:स्थितीत राज्यभरातील शिक्षक व अधिकाऱ्यांसाठी ४३ प्रकारच्या स्पर्धा सुरु आहेत. त्यामध्ये २६ डिसेंबर २०२५ रोजी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, बुलढाणा द्वारे, विभागीय पुस्तक परीक्षण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

विभागातील सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सदर स्पर्धेत सहभाग घेतला होता.

या विभागीय पुस्तक परीक्षण स्पर्धा २०२५-२६ मधे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, साखळी बु. येथील उपक्रमशील शिक्षिका तसेच उत्कृष्ट निवेदिका कु.किरण सांगळोदकर- वाघमारे यांनी मांडलेले विवेचन, भाषेचा ओघ आणि पुस्तकाचा सखोल अभ्यास पाहून परीक्षकांनी त्यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब केले असुन त्यांना राज्यस्तरीय पुस्तक परीक्षण स्पर्धेसाठी पात्र ठरविले आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे. तसेच राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्यांना सर्वांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## १८ गुरांची सुटका; गुन्हा दाखल

**जळगाव जामोद , ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** कत्तल करण्याच्या उद्देशाने विना चारापाणी, आखूड दोराने बांधलेल्या अवस्थेत असलेल्या १८ लहान-मोठ्या गुरांची पोलिसांनी सुटका केली. जळगाव जामोद येथे ५ जानेवारीच्या रात्री पोलिसांनी ही कारवाई केली.

पोलिसांनी कुरेशी मोहल्ल्यात पंचासमक्ष छापा टाकला असता नगर परिषदेसमोरील उघड्या भूखंडांवर गुरांना क्रूरपणे बांधण्यात आले होते. यामध्ये ८ मोठे बैल (प्रत्येकी २०,००० रुपये), ४ गोरे बैल (प्रत्येकी ८,००० रुपये) आणि ६ अन्य बैल (प्रत्येकी २०,००० रुपये) असल्याचे नोंदवले गेले. याबाबत पोलिस कर्मचारी संजय वासुदेव वेरूळकर यांनी तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) अधिनियमासह कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

## डाक विभागात एजंटसाठी अर्ज मागविले; २८ जानेवारीला उपस्थित राहण्याचे आवाहन

**बुलढाणा, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** भारतीय डाक विभागाकडून डाक जीवन विमा योजनेंतर्गत जिल्ह्यातील टपाल जीवन विमा योजनेसाठी थेट अभिकर्ता व क्षेत्र अधिकारी यांची नेमणूक करण्याकरिता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुकांनी आवश्यक कागदपत्रासह दि. २८ जानेवारी २०२६ रोजी उपस्थित राहावे, असे आवाहन डाकघर अधीक्षक गणेश आंभोरे यांनी केले आहे.

थेट अभिकर्तासाठी अर्जाचा नमुना बुलडाणा प्रधान डाक घर किंवा डाक अधीक्षक बुलडाणा यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. एजंट भरतीसाठी उमेदवाराचे किमान वय १८ वर्ष असावे, शैक्षणिक पात्रता किमान दहावी पास असावी. बेरोजगारीत किंवा स्वयंम रोजगारीत शिक्षित युवा, माजी जीवन सल्लागार, इन्शुरन्स कंपनीचे माजी एजंट, माजी सैनिक, अंगणवाडी सेविका, महिला मंडळ सेविका, सेवानिवृत्त शिक्षक व इतर अर्ज करू शकतील. उमेदवाराची निवड थेट मुलाखतीद्वारे व्यावसायिक कौशल्य, व्यक्तिमत्व, परस्पर संबंधाचे कौशल्य, जीवन विम्याबाबत ज्ञानाच्या आधारावर केली जाणार आहे.

निवड झालेल्या उमेदवारास ५ हजार रूपयांची अनामत रक्कम सुरक्षा ठेव म्हणून ठेवावी लागेल. सदर रक्कम राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र अथवा कृषी विकास पत्राच्या स्वरुपात राहणार आहे. प्रशिक्षण पूर्ततेनंतर डाक विभागाकडून तात्पुरता परवाना देण्यात येईल. हा परवाना आयआरडीएची परवाना परीक्षा पास केल्यानंतर कायमच्या परवान्यामध्ये रुपांतरीत केल्या जाणार आहे. ही परवाना परीक्षा नियुक्तीनंतर ३ वर्षाच्या आत पास करणे अनिवार्य राहिल. निवड झालेल्या उमेदवारास ठरविलेले कमिशन दिले जाणार आहे. इच्छुक उमेदवारांनी अधीक्षक, डाक घर कार्यालय, बुलडाणा ४४३००१ येथे विहित नमुन्यातील अर्ज आणि दहावी किंवा बारावी बोर्डाचे प्रमाणपत्र, जन्मतारखेचे प्रमाणपत्र, संगणक ज्ञानाचे प्रमाणपत्र, यासह सर्व शैक्षणिक प्रमाणपत्र, तसेच पॅन कार्ड, आधार कार्ड व अन्य संबंधित दस्ताऐवजासोबत दि. २८ जानेवारी २०२६ रोजी ११ ते २ वाजेदरम्यान उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी जवळच्या डाक कार्यालयाशी संपर्क साधावा, असे डाकघर अधीक्षक यांनी कळविले आहे.



# वीज कनेक्शन वेळेत मिळण्यासाठी नवी व्यवस्था

## शहरांमध्ये सात दिवसांत तर ग्रामीण भागात १५ दिवसात मिळणार वीज कनेक्शन



**बुलढाणा, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : ग्राहकाने अर्ज केल्यानंतर महानगरांमध्ये तीन दिवसात, शहरांमध्ये सात दिवसांत आणि ग्रामीण भागात १५ दिवसांत नवे वीज कनेक्शन देण्याच्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कालमर्यादेची तंतोतंत अंमलबजावणी करण्यासाठी महावितरणने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यपद्धतीत बदल केला आहे. त्यामुळे ग्राहकांना वीज कनेक्शनसाठी वाट पहावी लागणार नाही, असा विश्वास महावितरणच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

महावितरणकडून मुंबईचा काही भाग वगळता संपूर्ण राज्यात वीजपुरवठा सेवा दिली जाते. ग्राहकांना नव्या वीज कनेक्शनसाठी ऑनलाईन अर्ज करता येतो. अर्जासोबत दाखलेही जोडता येतात. महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून अर्जाची व कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर ग्राहकाला शुल्क भरण्याची सूचना दिली जाते. ग्राहकाने पैसे भरले की, नवा मीटर जोडून ग्राहकाला वीज कनेक्शन दिले जाते. सध्याची ही पद्धती अर्ज केल्यापासून नवे कनेक्शन दिल्याची यंत्रणेत नोंद होण्यापर्यंत पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली आहे. यामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक टप्प्यावर देखरेख करण्यात येत आहे. त्यामुळे वीज ग्राहकांना हमखास आयोगाने ठरवून दिलेल्या कालमर्यादेत नवी जोडणी मिळण्याचा विश्वास महावितरणच्या प्रशासनाला वाटतो.


महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने नवीन वीज कनेक्शनसाठी अर्ज केल्यानंतर महानगरांसाठी तीन दिवस, शहरांसाठी सात दिवस आणि ग्रामीण भागात १५ दिवसांत कनेक्शन देण्याची तरतूद केली असली तरी ती जेथे पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, त्यासाठी ही कालमर्यादा आहे. विजेचे खांब उभारून व तारा जोडून वीजपुरवठा उपलब्ध करण्यासारखी पायाभूत सुविधांची कामे गरजेची असतील तर तेथे ९० दिवसांत वीजजोडणी देण्याची कालमर्यादा आयोगाने निश्चित केली आहे. नव्या वर्षात सुरुवात महावितरणच्या प्रशासनाने केलेल्या सुधारणेमुळे नवीन वीज कनेक्शन देण्याच्या कामात गतीमानता येईल आणि अधिक पारदर्शकता येईल, असाही विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. नवे वीज कनेक्शन देण्याच्या बाबतीत महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कोठे दिरंगाई होत असेल तर माहिती तंत्रज्ञानामुळे नेमक्या कोणत्या टप्प्यावर विलंब झाला हे समजेल. परिणामी एकूण प्रक्रियेची गती वाढविणे शक्य झाले आहे. महावितरणची ही व्यवस्था १ जानेवारी २०२६ पासून सुरू झाली आहे.

# कोल्ही गवळी येथे शॉक लागून महिलेचा मृत्यू

**धामणगाव बढे, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : शेतात मजुरीसाठी गेलेल्या एका ५० वर्षीय महिलेचा विद्युत प्रवाहाचा जोराचा धक्का लागून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना मोताळा तालुक्यातील कोल्ही गवळी येथे ६ जानेवारी रोजी सकाळी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मयत कमलबाई डिंगाबर भारती (वय ५० वर्ष), राहणार कोल्ही गवळी, या आज सकाळी ९ वाजेच्या सुमारास आव्हा शेत शिवारातील डिंगाबर सुरेश बढे यांच्या शेतात इतर मजुरांसोबत कामासाठी गेल्या होत्या. काम करत असताना अचानक त्यांना विद्युत तारेचा स्पर्श झाला आणि जोराचा शॉक लागला. या अपघातात कमलबाई यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती सुमनबाई दिनकर ठोसर यांनी मयताचा मुलगा नवल नारायण भारती (वय ३२) याला फोनवरून दिली. मुलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि त्यानंतर दिलेल्या तक्रारीवरून धानोरा (धा. बढे) पोलीस स्टेशन येथे भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १९४ अन्वये मर्ग दाखल करण्यात आला आहे. ठाणेदारांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल संजय जवरे हे करत आहेत.

शेतात विद्युत प्रवाहाचा हा धोका नेमका कसा निर्माण झाला, याबाबत पोलीस अधिक तपास करत आहेत. कमलबाई डिंगाबर भारती यांचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. विद्युत तारेचा कशा रितीने स्पर्श झाला याबाबतची अधिक माहिती चौकशी नंतरच समोर येईल.

# स्किल पॅरामेडिकल कॉलेजचा उत्कृष्ट निकाल



**बुलढाणा, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : स्किल पॅरामेडिकल कॉलेज बुलढाणा येथील DMLT व AD.DMLT अभ्यासक्रमांचा शैक्षणिक २०२५ सत्रातील हिवाळी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून कॉलेजचा एकूण ७२ टक्के निकाल लागला आहे. या यशस्वी निकालामध्ये विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली असून कॉलेजच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या मेहनतीला प्राचार्या सौ. चैताली पाटील यांचे मार्गदर्शन तसेच अध्यक्ष डॉ. सचिन सुपे यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

या परीक्षेत प्रथम क्रमांक चांगले सुमित दिनेश ९२.८३%, द्वितीय क्रमांक हुसैन शादाब अकबर ८६.६७%, तृतीय क्रमांक ऋतुजा वसंत राठोड ८२.६७%, तृतीय क्रमांक शेख तनवीर शेख समद ८२.६७%, चतुर्थ क्रमांक बकाल वैष्णवी लक्ष्मण ८२.५०% या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे स्किल पॅरामेडिकल कॉलेज च्या सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी कौतुक केले.

# प्रत्येक शाखेसाठी इतिहास महत्त्वाचा : प्रा.डॉ.प्रमोद चव्हाण



**बुलढाणा, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : स्थानिक विदर्भ महाविद्यालय बुलढाणा येथे दिनांक ६ जानेवारी रोजी इतिहास विभागा अंतर्गत अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्राचीन भारतातील संस्कृती या विषयावर बोलताना भारतीय संस्कृतीला हजारो वर्षाचा इतिहास आहे. आजच्या पिढीने जर याचे महत्त्व समजून घेतले तर भविष्यात अनेक चुका टाळता येतील म्हणूनच प्रत्येक शाखेसाठी इतिहास विषय महत्वाचा आहे असे प्रतिपादन या व्याख्यान मालेत बोलताना खामगाव येथील भास्करराव शिंगणे महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रमोद चव्हाण यांनी आपले मत व्यक्त केले

तर दुसरे व्याख्याते शेगाव येथील जी. बी. मुरारका महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.विलास डेहनकर यांनी भारतीय संस्कृतीची मूलभूत तत्वे आणि वैशिष्ट्ये यावेळी स्पष्ट केली. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.एम. टी. जमाईवार हे होते तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.संगीता पवार यांनी केले. यावेळी प्रा. वैभव वाघमारे यांनी अतिथींचे आभार मानले यावेळी प्रा. डॉ.पी. डी. हुडेकर, प्रा.सीमा काळणे उबरहांडे, वारे तसेच बी ए व बी कॉम भाग एक चे विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

# न.प शाळा क्र.६ मध्ये सावित्रीमाईंना अभिवादन

**बुलढाणा, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : शाळा क्रमांक ६ मध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून खामगाव नगराध्यक्षा अपर्णाताई सागर फुंडकर ह्या होत्या. तर प्रमुख उपस्थितीमध्ये खामगाव नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ.प्रशांत शेळके, नायब तसीलदार भाजीभाकरे मॅडम, उपमुख्याधिकारी आनंद देवकते नगरसेवक भुसारी ताई, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संजय वानखडे व सदस्य मुख्याध्यापिका आशालाता मुऱ्हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात ही क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस हर अर्पण करून व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. तर इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनचरित्रावर नाटिका सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली क्षीरसागर तर आभार प्रदर्शन महेंद्रसिंग चव्हाण यांनी केली. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका यांचे सहकार्य लाभले.

**CHANGE OF NAME**

My Passport Number is N8373397

**OLD NAME : RAVINA BHAGWAN INGLE**

**NEW NAME : RAVINA BHAGWANRAO INGLE**


**ADDRESS :** ROW HOUSE NO.4 JANGADA NAGAR, RAJUR ROAD JALNA, TQ. DISTRICT JALNA MAHARASHTRA PINCODE - 431203

# खामगांव शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला अध्यक्षपदी शारदा शर्मा



**खामगांव, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : बुलढाणा येथे अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची जिल्हा आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्या सौ.शारदाताई शर्मा यांची खामगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला अध्यक्षपदी निवड करण्यात आली. या बैठकीला बुलढाणा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष ॲड.नाझेर काझी, आमदार मनोज कायंदे,राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश सचिव निर्मलाताई तायडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. शारदाताई शर्मा यांना समाज कारणाची आवड असुन त्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या होतकरु कार्यकर्त्या आहेत. त्यांचे महिलांमध्ये चांगले संघटन कौशलय आहे, त्यामुळे शारदाताई शर्मा यांची खामगाव शहर महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश सचिव निर्मलाताई तायडे यांच्या हस्ते सौ.शारदाताई शर्मा यांचा सत्कार करण्यात आला. शारदाताई शर्मा यांची खामगाव राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला अध्यक्षपदी निवड झाल्याबदद्ल कौतुक होत आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पंजाबराव देशमुख, खामगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती सरस्वतीताई खासने, तालुका अध्यक्ष मनोज वानखडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित नगरसेविका तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या न.प.गटनेत्या फौजीया शेख आबीद, नवनिर्वाचित तहेसीन शाह, नवनिर्वाचित नगरसेविका गायत्री तासतोडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

# बाल शिवाजी कॉन्व्हेंट मध्ये सावित्रीमाईंना अभिवादन





**बुलढाणा, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित बाल शिवाजी कॉन्व्हेन्ट बुलढाणा येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमासाठी रणजीतसिंग राजपूत अध्यक्ष, बुलढाणा जिल्हा पत्रकार संघ, पत्रकार संदीप वानखडे हे विशेष अतिथी म्हणून लाभले होते. प्रमुख अतिथी म्हणून नजीम पठाण समन्वयक बाल शिवाजी कॉन्व्हेन्ट शाळेच्या मुख्याध्यापिका निशा पाटील व पर्यवेक्षिका वृषाली जोशी उपस्थित होत्या. सुरुवातीला विशेष पाहुण्यांचे हस्ते दीप प्रज्वलन करून सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर शाळेचे समन्वयक पठाण यांनी आपले प्रास्ताविक सादर करताना प्रास्ताविका मध्ये अतिथीविषयी माहिती दिली. यावेळी सावित्रीबाईंनी त्या काळामध्ये सामाजिक व असमानते विरुद्ध लढा देऊन समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी परंपरा जसे बालविवाह, केशव पण प्रथा, सतीची चाल इत्यादी विरुद्ध आवाज उठवून स्त्री शिक्षणाला विरोध असून सुद्धा स्त्री शिकली पाहिजे यासाठी समाजाच्या विरोधात जाऊन लढा दिला त्यासाठी त्यांनी खूप त्रास सहन केला. त्या घरोघरी जाऊन मुलींना शाळेमध्ये शिक्षण घेण्यासाठी आणत या अशा भारतातील पहिल्या मुख्याध्यापिका, शिक्षिका ,समाज सुधारक व कवियत्री यांचा आदर्श विद्यार्थ्यांनी समोर ठेवावा असे विचार विशेष अतिथी रणजीतसिंग राजपूत यांनी व्यक्त केले शाळेच्या शिक्षिका हेमवती जाधव यांनी सावित्रीबाई फुले यांच्या विषयी माहिती दिली. त्यानंतर सावित्रीबाई फुले यांच्या गीतावर सीनिअर केजी च्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. त्याचे मार्गदर्शन विद्या बिडकर यांनी केले होते सावित्रीबाई फुले यांच्या जीवनातील काही प्रसंग इयत्ता तिसरी(अ) इयत्ता इयत्ता चौथी (अ) व इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी नाटकाच्या स्वरूपात सादर करण्यात आले. या नाटकाचे मार्गदर्शन अस्मिता खंडेराव व रुपाली खेडकर यांनी केले होते त्यानंतर स्नेहसंमेलना मधील सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भाग घेतलेला विद्यार्थ्यांना अतिथींच्या हस्ते बक्षीस वितरण व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका निशा पाटील व पर्यवेक्षिका वृषाली जोशी यांनी विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले.

यावेळी इयत्ता चौथीचा विद्यार्थी विवान खंडारे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व इयत्ता पाचवी ची विद्यार्थीनी हर्षदा काळवाघे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या भूमिके मध्ये उपस्थित होते. तसेच इतर ही विद्यार्थिनी सावित्रीबाई फुले यांच्या पोषकांमध्ये आलेल्या होत्या. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन चेतना काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन अस्मिता खंडेराव यांनी केले. यासाठी सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# खामगांवात पत्रकार दिन उत्साहात साजारा



**खामगांव, ७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : शिकायते तेरे से बहुत है,ए जिंदनी पर दर्द जब दर्ज करणे गया, कतारे बहुत थी, लोक त्यांची वेदना,त्यांची दुखे पत्रकारांजवळ येउन सांगतात तेव्हा पत्रकार त्यांचा शब्द,त्यांचा आवाज होतो.समाजाला आणि लोकांना पत्रकारांनी समाजामध्ये चाललेल्या वेगवेळ्या प्रकारामुळे बातमी पेरत असतांना तळागळातील लोकांना ज्याप्रमाणे दुखः होत.तशीच एक वेळ पत्रकारांना दुखः वेदना व्यक्त करतांना होते.मात्र पत्रकारांचे दुःख वेदना समजून घेण्याच्या वेळेलाही लोक हे पत्रकारांचे काम आहे या नजरेने पाहत त्यांना कामाच्या नजरेने बघतात. असे मत उपविभागीय अधिकारी डॉ.रामेश्वर पुरी पत्रकार दिनानिमित्य आयोजित खामगाव प्रेस क्लब खामगाव आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले. आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती दरवर्षी ६ जानेवारी रोजी पत्रकार दिन म्हणुन साजरी करण्यात येते. यानिमीत्य पत्रकार भवनात खामगाव प्रेस क्लबच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

तर दरवर्षीप्रमाणे प्रतिष्ठेचे पुरस्कार यंदाही वितरीत करण्यात आले आहेत.सकाळी ११ वाजता पत्रकार भवन येथे आयोजीत कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खामगाव प्रेस क्लब अध्यक्ष किशोरआप्पा भोसले हे होते. तर माजी आ. दिलीपकुमार सानंदा, काँग्रेस नेते ज्ञानेश्वरदादा पाटील, वंचित बहुजन आघाडीचे नेते अशोकभाऊ सोनोने, एसडीओ डॉ. रामेश्वर पुरी, तहसीलदार सुनिल पाटील, ज्येष्ठ पत्रकार डॉ. राजेश राजोरे, चंद्रकांत रेठेकर, अमोल अंधारे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांनी दिप प्रज्वलन केले. तसेच माता सरस्वती, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बाळशास्त्री जांभेकर, आद्य महिला पत्रकार तानुबाई बिर्जे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यामध्ये खामगाव रत्न संजय खंडेराव,खामगाव गौरव श्री हनुमान व्यायाम मंडळ, बाळासाहेब बिन्नीवाले पुरस्कार अनिल खोडके तर युवा पत्रकारिता प्रेरणा पुरस्काराने सुरज बोराखडे यांना सन्मानित करण्यात आले. तसेच पत्रकारितेत पीएचडी केल्याबद्दल डॉ. राजेश राजोरे, नवनिर्वाचित नगरसेवक पत्रकार सतीषआप्पा दुडे, पत्रकार तहसीन शाह आणि पत्रकार श्रीकांत भुसारी यांच्या सुविद्य पत्नी नगरसेविका ज्योती भुसारी यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेश राजोरे, संचलन अनिल गवई तर आभार प्रदर्शन किशोरआप्पा भोसले यांनी केले. कार्यक्रमाला शहरातील प्रतिष्ठित नागरिक, राजकीय पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार बांधव उपस्थित

सायंदैनिक गुड इव्हिनिंग City

**हे पत्रक प्रकाशक, मालक तथा कार्यकारी संपादक रणजीतसिंग राजपूत** 9850377344 **यांनी कल्पक प्रिंटर्स, सराफा लाईन, बुलडाणा येथे छापून गुड इव्हिनिंग सिटी कार्यालय, गाळा क्र.२, पत्रकार भवन , बुलडाणा येथे प्रसिध्द केले. *कायदेशीर बाबी उद्‌भवल्यास बुलडाणा न्यायालयाअंतर्गत. फोन नं. (07262) 241026 संपादक : हरिदास उंबरकर** 9763469184. RNI Reg.No.MAHMAR/2012/46689